**महाराष्ट्र विधानसभा**
**पहिले अधिवेशन, २०२३**

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**शुक्रवार, दिनांक ०३ मार्च, २०२३ / फाल्गुन १२, १९४४ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | ग्रामविकास व पंचायत राज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री | |
| (३) | कामगार मंत्री | |
| (४) | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री | |
| (५) | पर्यटन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री, महिला व बालविकास मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३१**

---

**उत्तर नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय आणि अनुसंधान केंद्राच्या विस्तारीकरणाच्या प्रकल्पाबाबत**

**(१) * ५९९५६ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उत्तर नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय आणि अनुसंधान केंद्राच्या विस्तारीकरणाच्या प्रकल्पाला मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात येऊन रु.११६५ कोटी निधी मंजूर करण्यात आला असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाची अद्याप सुरुवात करण्यात आलेली नसून या रुग्णालयातील डॉक्टर कंत्राटी पद्धतीवर कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय आणि अनुसंधान केंद्राचे विस्तारीकरण याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, सदर रुग्णालयाच्या झालेल्या दुरवस्थेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय.

(२) होय.

(३) सदर प्रकल्प पूर्ण करण्याकरीता आवश्यक असलेल्या जागेपैकी १५०० चौ.मी. जागेवर न्यू ग्रॅन्ट एज्युकेशन संस्थेची इमारत असून संस्थेने न्यायालयात दाव दाखल केल्याने सदर प्रकरण मा.उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे.

(४) संस्थेचा बाह्यरुग्ण विभाग सुरळीत कार्यान्वित असल्याने कोणतीही दुरावस्था झालेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वेल्हे (जि.पुणे) तालुक्यातील आरोग्य सेवा सुधारण्यासाठी करावयाची उपाययोजना

**(२) * ५८२८१ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.संजय जगताप (पुरंदर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करंजावणे (ता.वेल्हे,जि.पूणे) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार न मिळाल्यामुळे मजूराचा मृत्यू झाल्याचे दिनांक ६ जानेवारी ,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन जबाबदार आरोग्य अधिकाऱ्यांवर कारवाई करणेसह वेल्हे तालुक्यातील आरोग्य सेवा सुधारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत** : (१) हे अशंत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र, करंजावणे येथे दि. ०३.०१.२०२३ रोजी रात्री ०९.०५ मिनिटाच्या सुमारास रुग्ण आला होता. सदर रुग्णाच्या छातीत दुखत असुन श्वास घेण्यास त्रास होत असल्याचे सांगण्यात आले. त्यावेळेस प्राथमिक आरोग्य केंद्रात उपस्थित आरोग्य सेविकेने रात्री ०९.०६ मिनिटांनी वैद्यकीय अधिकारी यांना दुरध्वनी करुन सांगितले. वैद्यकीय अधिकारी यांनी दुरध्वनीवर सांगितल्याप्रमाणे आरोग्य सेविकेने Tab Sorbitrate रुग्णाच्या जिभेखाली ठेवली. वैद्यकीय अधिकारी रात्री ९.२१ मिनिटांनी प्राथमिक आरोग्य केंद्रात उपस्थित झाल्या व रुग्णाची नाडी तपासली व्यवस्थित न लागल्याने लगेच सी.पी. आर देण्यात आला. ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर चालू करण्यात आला व संदर्भ सेवेसाठी १०८ ला संपर्क केला पण हे ०५ ते १० मिनिटात घडल्याने संदर्भ सेवा देणे शक्य झाले नाही. सदर रुग्णाचा मृत्यु रात्री ९.२७ मिनिटांनी झाला.

(२) याबाबत तालुका आरोग्य अधिकारी यांचे मार्फत घटनेची चौकशी करण्यात आली असता,रुग्णाचा मृत्यु हा उपचारादरम्यान झालेला असल्याने प्रथम दर्शनी वैद्यकीय अधिकारी जबाबदार असल्याचे दिसून येत नाही. मृत्युपश्चात रुग्णाचे शवविच्छेदन करण्यात आले असता शवविच्छेदन अहवालामध्ये सदरचा मृत्यु Acute Myocardial Infarction मुळे झाला असल्याचे नमुद करण्यात आले आहे.

जिल्हास्तरीय अधिकारी यांनी व्हीसीव्दारे आढावा बैठकामध्ये कामकाज सुधारणा विषयी सुचना दिलेल्या आहेत. त्याचप्रमाणे क्षेत्रभेटी देवुन आरोग्य सेवा सुविधा पुरविण्यामध्ये कोणतीही कमतरता राहणार नाही

याबाबत आरोग्य अधिकारी व कर्मचारी यांना सुचना केलेल्या आहेत.

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे, उपसंचालक, आरोग्य सेवा पुणे, व्हीसी व्दारे नियमित आढावा बैठकामध्ये आरोग्य सेवा बळकटीकरणबाबत आवश्यक ते सुचना देण्यात येतात.

(३) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

**राज्यातील अंगणवाडी सेविका, मदतनीस यांच्या मानधनात वाढ करण्यातबाबत**

**(३) * ५६५६७ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.दौलत दरोडा (शहापूर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.संजय बनसोडे (उदगीर), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.चेतन तुपे (हडपसर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आकाश फुंडकर (खामगांव), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.अजित पवार (बारामती), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.हरिभाऊ बागडे (फुलंब्री), श्री.प्रकाश आबिटकर(राधानगरी), श्री.पी.एन.पाटील (करवीर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी मानधनात वाढ, शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना एकरकमी सेवासमाप्ती लाभ, निवृत्तीवेतन लाभ, रिक्त पदे भरणे, भ्रमणध्वनी पुरविणे, विमा कवच पुरविणे, पोषण ट्रक ॲप राजभाषेत असणे, पूरकपोषण आहाराचे दर वाढवून देणे, अंगणवाडी केंद्रांच्या भाडयाची तसेच सी.बी. योजनेची थकित रक्कम देणे, बोनस, ग्रॅच्युईटी, प्रशिक्षण, अनुकंपा तत्वावरील नियुक्त्या, पुर्ण काम पुर्ण वेतन इत्यादी विविध मागण्यांसाठी दिनांक ३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास मुंबई येथील आझाद मैदान येथे

धरणे आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागण्यांबाबतचे सविस्तर निवेदन अंगणवाडी संघटना पदाधिकाऱ्यांनी मा.मुख्यमंत्री, मा.महिला व बालविकास मंत्री व प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग यांना भेटून दिनांक ३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंगणवाडयांमधील रिक्त पद भरती सहा महिन्यात पूर्ण करण्याचे निर्देश मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक १३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास दिल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

अंगणवाडी कर्मचाऱ्यांची मंजुर पदसंख्येच्या मर्यादेत असलेली सर्व रिक्त पदे भरण्यास शासन निर्णय दिनांक ०९.०१.२०२३ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

(४) अंगणवाडी कर्मचा-यांच्या विविध मागण्यांबाबत अंगणवाडी कर्मचारी संघटनांसमवेत वेळोवेळी बैठक आयोजित करुन कार्यवाही करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यात पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या घरकुलांचे उद्दीष्ट वाढवून अनुदानाच्या रकमेत वाढ करण्याबाबत

**(४) * ५८३९० ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत घरकुलाचे ४०४६ लाभार्थ्यांना जागा उपलब्ध नसल्यामुळे लाभार्थी घरे मिळण्याच्या लाभापासून वंचित राहिल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्ह्यात पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरकुलासाठी सन २०२१-२२ मध्ये ४२९६ इतक्या घरांचे उद्दीष्ट ठेवण्यात आले असून लाभार्थ्यांची मागणी मोठया प्रमाणावर असल्याने उद्दीष्ट वाढविणेबाबत व सदर योजनेसाठीचे अनुदान रुपये एक लाख वीस हजार वरुन रुपये अडीच लाख पर्यंत वाढविण्याबाबत लाभार्थ्यांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घरकुलांकरीता जागा घेण्यासाठी निधी वाढविणेबाबत लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन घरांचे उद्दिष्ट वाढविण्याबाबत, घरांकरीता जागा उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच घरकुल योजनेचे अनुदान वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत राज्याला दरवर्षी प्राप्त होणारे उद्दिष्ट जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावर केंद्र शासनाकडून वितरीत करण्यात येते. ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत पात्र परंतु भुमिहीन लाभार्थ्यांना जागा देण्यासाठी दिनांक १४ जुलै, २०१७, दि.१६ फेब्रुवारी,२०१८, दि.२ ऑगस्ट,२०१८ व दि.२२ ऑगस्ट, २०२२ च्या शासन निर्णयांन्वये राज्य शासनाने निर्णय घेतले आहेत. तसेच सदर शासन निर्णयास अनुसरुन पंडीत दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजने अंतर्गत, १०६२ लाभार्थींना जागा उपलब्ध करुन दिली आहे. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत लाभार्थ्यांचे अनुदान रु.२.५० लक्ष करण्याबाबत ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचेकडे दि.२५/११/२०२० व दि.०१/०८/२०२२ रोजीच्या पत्रांन्वये मागणी केली आहे. या संदर्भात केंद्र शासनाकडून अद्याप प्रतिसाद प्राप्त झाला नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बोईसर (जि.पालघर) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकामास निधी मंजूर करण्याबाबत

**(५) * ५६९८२ श्री.चेतन तुपे (हडपसर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-(१) बोईसर (जि. पालघर) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाची इमारत अत्यंत धोकादायक झाली असल्याची बाब कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर यांच्या दिनांक ०५ जून,२०२० रोजीच्या संरचनात्मक लेखापरीक्षण अहवालानुसार निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, पालघर यांना दिनांक १५ सप्टेंबर,२०२० रोजी वा त्यासुमारास निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाच्या नवीन इमारतीसाठी दीड एकर शासकीय जागा आरक्षित करुन त्या कामास तीन वर्षांपूर्वी मंजुरी देऊन कामाचा शुभारंभ देखील करण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, इमारत बांधकामासाठी २० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असताना या कामास अद्याप निधी देण्यात आलेला नसल्यामुळे परिणामी रुग्णांना खाजगी रुग्णालयात उपचार घ्यावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्रामीण रुग्णालय इमारत बांधकामास तातडीने निधी मंजूर करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत** : (१) हे खरे आहे

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) ग्रामीण रुग्णालय, बोईसर, जि.पालघर येथील ३० खाटांच्या रुग्णालयाचे बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखडे IPHS २०२२ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार फेरसादर करण्याबाबत आरोग्य सेवा आयुक्तालयास कळविण्यात आलेले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**पेण तालुक्यातील (जि.रायगड) आदिवासी वाडयातील नागरिक मतदानाच्या हक्कापासून वंचित असल्याबाबत**

**(६) * ५९२१४ श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री. दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री. जयंत पाटील(इस्लामपूर), डॉ. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव):** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) तालुक्यातील उंबरमाळ, तांबाडी, काजूचीवाडी, केळीचीवाडी तसेच खऊसावाडी येथील नागरीक गत ७५ वर्षांपासून मतदानाच्या मुलभूत हक्कांपासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड तालुक्यातील गावांमध्ये सुमारे ३५०० आदिवासी बांधवाची लोकवस्ती असून या वाडयांपासून जवळच असलेल्या बोरगाव व मळेघर या दोन्ही ग्रामपंचायतींनी सदर आदिवासीपाडे आपल्या कार्यक्षेत्रात येत नसल्याचे सांगितल्यामुळे या आदिवासी बांधवांना गेल्या अनेक वर्षांपासून मतदानाचा हक्क बजावता आलेला नसल्याचे दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त नागरीकांना त्यांचे मुलभूत हक्क तातडीने मिळण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) पेण तालुक्यातील उंबरमाळ, तांबडी, काजूचीवाडी, केळीचीवाडी व खऊसावाडी आदिवासी वाडयांमध्ये सन २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या ५६२ इतकी आहे. सदर आदिवासी वाडया मधील नागरिकांची नावे

पेण विधानसभा मतदार संघात समाविष्ट आहेत. त्यानुसार सदर मतदार लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीला मतदान करतात.

तथापि, सदर वाडयांचा शेजारच्या बोरगाव व मळेघर या दोन्ही ग्रामपंचायतीच्या प्रभाग रचनमध्ये समावेश न झाल्यामुळे ग्रामपंचायतीच्या निवडणूकीमध्ये या ग्रामस्थांनी मतदान केलेले नाही. तथापि, सन २०२३ मध्ये बोरगाव ग्रामपंचायतीच्या प्रभाग रचनेमध्ये वरील ५ वाडयांचा समावेश करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात मुलींसाठी अनुरक्षणगृह उभारणेबाबत

**(७) * ५६७३५ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बालगृहातील बालकांना १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्यांना अनुरक्षण सेवेचा लाभ मिळण्यासाठी अनुरक्षणगृहात दाखल करण्याची तरतूद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात केवळ नाशिक येथे मुलींसाठी एकमेव अनुरक्षणगृह असल्यामुळे विदर्भासह इतर विभागांतील १८ वर्षे पूर्ण झालेल्या मुलींना बालगृहातून शासनाच्या इतर संस्थांमध्ये (स्वाधार, नारीनिकेतन) येथे हलविले जात असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले ,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बालगृहात मुली अल्पवयीन असताना एका संरक्षित वातावरणात शिक्षण घेत असतात मात्र १८ वर्षे पुर्ण झाल्यानंतर त्यांना अचानक वेगळया वातावरणात हलविले जात असल्यामुळे त्यांच्या मनावर वाईट परिणाम होत असल्याचे तज्ञ सांगत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेऊन विदर्भ, कोल्हापूरसह इतर विभागांत मुलींसाठी अनुरक्षणगृह तातडीने उभारणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.

अद्याप पर्यंत शासन अथवा अधिनस्त कार्यालयांकडे असा कोणताही अहवाल अथवा तक्रार प्राप्त नाही.
(४) राज्यामध्ये महिलांसाठी एकुण १२ स्वाधारगृहे, २२ शासकीय महिला राज्यगृहे/ संरक्षणगृह अशा एकूण ३४ संस्था कार्यरत असून या संस्थांमध्ये वयाची १८ वर्ष पूर्ण होवून संस्थांमधून बाहेर पडणाऱ्या परंतु शिक्षण/ प्रशिक्षण

अपूर्ण राहिलेल्या बालिकांना सदर संस्थांमध्ये प्रवेश देण्यात येतो.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जेजूरी (ता.पुरंदर,जि.पुणे) येथील औद्योगिक वसाहतीत आपत्कालीन व्यवस्थापन समितीची स्थापना करण्याबाबत

**(८) * ५९७८४ श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जेजूरी (ता.पुरंदर, जि.पुणे) येथील औद्योगिक वसाहतीत दिनांक ३० डिसेंबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास बर्जर पेंट कंपनीत स्फोट होऊन एका कामगाराचा मृत्यू तसेच आय.एस.एम.टी कंपनीमध्ये अपघात झाला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, भविष्यात होणाऱ्या अपघाताच्या घटना थांबविण्यासाठी सदरहू औद्योगिक वसाहतीत त्वरीत आपत्कालीन व्यवस्थापन समितीची स्थापना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खोडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मे. बर्जर पेंन्टस इंडीया लि. या कारखान्यातील अपघाताची चौकशी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून करण्यात आली आहे.

चौकशीदरम्यान श्री.रोहित जयवंत माने हा कंत्राटी कामगार प्रोटेक्ट ऑन प्लांन्ट मधील बॉलमिलमध्ये झायलीन टाकण्याचे काम करीत होता .यावेळी, स्टॅटीक चार्जमुळे अचानक बॉलमिलच्या चार्जिंगशुट मधून आगीचा भडका उडाल्याने, श्री .रोहित माने या कामगारास जखमा झाल्याचे निदर्शनास आले. त्यास रुग्णालयात दाखल केले असता दि.३०.१२.२०२२ रोजी त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

मृत कामगार हे राज्य कामगार विमा योजनेअंतर्गत नोंदणीकृत असून नुकसान भरपाई मिळणेबाबत पाठपुरावा सुरु आहे .तसेच, कारखाना व्यवस्थापनाने मृत कामगाराच्या वारसांना सानुग्रह अनुदान म्हणून रु.२५.०० लाख इतकी रक्कम अदा केलेली असून, मृत कामगाराच्या भावास नोकरी देण्याचे मान्य केले आहे.

मे.आय.एस.एम.टी.लि .पोस्ट कोलविहीरे, ता.पुरंदर, जि.पुणे या कारखान्यातील अपघाताची चौकशी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून करण्यात आली आहे. चौकशीदरम्यान दि.१४.११.२०२२ रोजी कारखान्यात मोल्टन मेटल ने भरलेले लॅडल क्रेनच्या रोपसह जमिनीत बनविलेल्या पीट मध्ये कोसळले .त्यामुळे उष्ण मोल्टन मेटल कारखान्यात इतरत्र उडाल्याने त्या परिसरात काम करणारे ५ कंत्राटी कामगार भाजून जखमी झाल्याचे निदर्शनास आले आहे .या ५ कामगारांपैकी ४ कामगारांना किरकोळ तर एका कामगारास १५ ते २० % भाजण्याच्या जखमा झाल्या होत्या .उपचारानंतर सर्व कामगार पुन्हा कामावर रूजू झाले आहेत.

उपरोक्त दोन्ही कारखान्यातील अपघात प्रकरणी क्षेत्रिय सरकारी कामगार अधिकारी यांनी कारखाना व्यवस्थापनाविरुद्ध विविध कामगार कायद्यांतर्गत निरीक्षण शेरे पारित केले असून, त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरु

आहे.

तसेच, उपरोक्त दोन्ही कारखान्याच्या भोगवटादारांविरुद्ध कारखाने अधिनियम, १९४८ च्या नियमभंगाबाबत मा.अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, पुणे यांच्या न्यायालयात फौजदारी खटले दाखल करण्यात आले आहेत .तसेच दोन्ही अपघात प्रकरणी पोलीस विभागाकडून चौकशी सुरु आहे.

(३) औद्योगिक वसाहतीत अपघाताच्या घटना थांबविण्यासाठी समितीची स्थापना करण्याबाबत कारखाने अधिनियम,१९४८ मध्ये तरतूद दिसून येत नाही.

तथापि, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत कारखान्यांमध्ये अपघाताच्या घटना घडू नये याकरिता तसेच सुरक्षेच्यादृष्टीने मार्गदर्शक सूचना देण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**हासेगाव (ता.औसा, जि.लातूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीच्या नवीन बांधकामास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(९) * ५९२४४ श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) हासेगाव (ता.औसा, जि.लातूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत धोकादायक झाली असल्याने वापरण्यास योग्य नसल्याबाबत तसेच सदरील इमारतीचे पाडकाम करण्याबाबत जिल्हा परिषद, लातूर च्या सर्वसाधारण सभेत ठराव घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीचे संरचनात्मक लेखापरीक्षणे (Structural Audit) न झाल्याने सदरील इमारतीचे आवश्यक दुरुस्ती तसेच पाडकाम व नवीन बांधकाम करण्याची कार्यवाही गेली दोन वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील इमारतीचे आवश्यक दुरुस्ती तसेच पाडकाम व नवीन बांधकाम करण्याची कार्यवाहीस विलंब होत असल्याने नागरीकांना आरोग्य सेवा मिळण्यास गैरसोयीचे होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरील विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच याकडे दुर्लक्ष करण्या-या संबधित जबाबदार दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करणेसह सदरील धोकादायक इमारतीचे पाडकाम व नवीन बांधकाम करण्याबाबत आवश्यक निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे,

(२), (३) व (४) प्रस्तुत प्रकरणी, प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत निर्लेखन करुन पाडण्यापुर्वी इमारतीचे संरचनात्मक लेखापरिक्षण आवश्यक असल्याने, सदर लेखापरिक्षणासाठी रु.४०,०००/- इतका निधी जिल्हा वार्षिक योजनेतून उपलब्ध करण्याबाबत प्रस्ताव जिल्हाधिकारी, लातूर यांना सादर करण्यात आला आहे. संरचनात्मक लेखापरिक्षणानंतर पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यातील जलजीवन मिशन अंतर्गत कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(१०) * ५९५५३ श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येत असलेल्या जलजीवन मिशन अंतर्गत कामांमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत जिल्हाधिकारी, बीड यांनी अपर जिल्हाधिकारी, बीड यांच्या अध्यक्षतेखाली सहा सदस्यीय चौकशी समिती गठीत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने चौकशी करून अहवाल जिल्हाधिकारी, बीड यांना सादर केला असून त्यांनी सदर अहवालानुसार सर्व संबंधित दोषींवर कारवाई करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना कळविले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी यासंदर्भात लोकप्रतिनिधी, नागरिकांच्या तक्रारी तसेच वर्तमानपत्रात वारंवार बातम्या येत असतानाही कारवाई करण्याऐवजी त्याकडे दुर्लक्ष करीत ही कामे संबंधित एजन्सीना गंभीर त्रुटी असतांना वाटप केली, तसेच त्याच विभागातील कर्मचाऱ्यांनी निविदा प्रक्रियेत अनियमितता करत स्वतःच्या नातेवाईकांच्या संस्थांना नियमबाह्यरित्या कामे दिली असतानाही त्याकडे दुर्लक्ष करुन त्यांना पाठीशी घातले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अपर जिल्हाधिकारी, बीड यांच्या अहवालातील दोषी अधिकारी, कर्मचारी, कॉन्ट्रॅक्टर, यांच्यावर गुन्हे दाखल करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.पाणीपुरवठा मंत्री यांच्याकडे दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून सर्व संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

जिल्ह्यात जल जीवन मिशन अंतर्गत राबवावयाच्या नळ पाणी पुरवठा योजनांसाठी शासनाच्या संकेतस्थळावर ई-निविदा नोटीस प्रसिध्द करून स्पर्धात्मक दराने पात्र ठरलेल्या नोंदणीकृत निविदा धारकांना कामे देण्यात आली

सदर प्रकरणी तत्कालीन निविदाशाखेचे संबंधित वरिष्ठ लिपीक यांना चौकशी दरम्यान खबरदारीची उपाययोजना म्हणून दिनांक ०४.१०.२०२२ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आलेले आहे. तसेच उप कार्यकारी अभियंता या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेल्या उप कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) यांचा विभागीय चौकशीचा प्रस्ताव आयुक्त, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर केलेला आहे.

(४) हे खरे आहे.

(५) संबंधित कर्मचारी यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे. तसेच दोषी कंत्राटदाराविरुध्द गुन्हा दाखल करणेसाठी उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, परळी यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हयात स्वच्छ पाणीपुरवठा करणेबाबत

**(११)** * **५७८९४ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयात आरोग्य विभागाने तपासलेल्या पाण्यांच्या नमून्यांपैकी ६५ जलस्त्रोत अस्वच्छ असल्याचे माहे नोव्हेंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अस्वच्छ जलस्त्रोतांपैकी तालुकानिहाय परभणी २४, पूर्णा १३, जिंतूर १३ येथील स्त्रोतांचा समावेश असल्याचे आरोग्य विभागाच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी पाणी शुद्धीकरण अनियमित करणे, पाणी स्तोत्रांचा परिसर अस्वच्छ ठेवणे, नळ गळके असणे, पुरेशा प्रमाणात टीसीएल पावडरचा वापर न करणे इत्यादी कारणामुळे पाणी अस्वच्छ राहून तेथे साथीच्या रोगांचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली तसेच स्वच्छ पाणी पुरवठा करण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) परभणी जिल्ह्यात माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये ६५ स्त्रोतांचे पाणी नमुने दुषित आढळून आले. तथापि, यामुळे वा मागील तीन वर्षांमध्ये जलजन्य साथरोग सदृश्य घटना आढळून आलेली नाही.

जैविक तपासणीत बाधीत आढळून आलेल्या सदरच्या जलस्त्रोतांचा परिसर स्वच्छ करण्यात येवून, त्या ठिकाणी टिसीएल पावडरचा वापर करून पाणी शुद्ध करण्यात आले.

साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव होवू नये, म्हणून ग्रामपंचायतीद्वारे दुषित पाणी स्त्रोतांचे शुद्धीकरण करणे, पाणी स्त्रोतांच्या परिसरातील अस्वच्छता दूर करणे, नळ गळती बंद करणे, पुरेशा प्रमाणात टि.सी.एल. पावडरचा वापर करून ग्रामस्थांना शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणेबाबत आणि ३२-३४% क्लोरिनयुक्त ब्लिचिंग पावडरचा तीन महिने पुरेल इतका साठा उपलब्ध ठेवण्याबाबत सर्व ग्रामपंचायतींना संबंधित आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडून वेळोवेळी कळविण्यात येते.

तसेच जैविक तपासणीत बाधीत आढळलेल्या जलस्त्रोतांवर आरोग्य विभागाच्या सल्ल्यानुसार जलसुरक्षकाच्या मदतीने पाण्याचे शुद्धीकरण करण्यात येते. याकरीता जलसुरक्षकांना, आरोग्य विभाग, पंचायत समिती आणि पाणी व स्वच्छता मिशन विभाग, जिल्हा परिषद यांच्यामार्फत पाणी शुद्धीकरणाच्या अनुषंगाने प्रशिक्षण देण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्हातील शासकीय रुग्णालयात प्रसुतीसाठी दाखल झालेल्या गर्भवती महिलांच्या नवजात बालकांचा प्रसृत्तीपूर्वीच मृत्यू झाल्याबाबत

**(१२) * ५७१८९ श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेळगांव पाडे (ता.मालेगाव,जि.नाशिक) येथील श्रीमती प्रियंका उध्दव जाधव यांना प्रसृतीसाठी येथील सामान्य रुग्णालयात दाखल केले असता वेळेवर वैद्यकीय अधिकारी उपलब्ध न झाल्यामुळे नवजात बालकांचा प्रसूत्तीपूर्वीच मृत्यू झाल्याची घटना माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच,नाशिक जिल्हा शासकिय रुग्णालयात प्रसुतीसाठी दाखल झालेल्या गर्भवती महिलेला रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी किरकोळ कारणावरुन केलेल्या मारहाणीत अर्भकाचा मृत्यू झाल्याचे दिनांक ९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) वैद्यकीय अधिक्षक सामान्य रुग्णालय, मालेगांव यांच्या स्तरावरुन प्राथमिक चौकशी करण्यात आलेली असून संबंधिताविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## एम.बी.बी.एस. प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची आर्थिक फसवणूक केल्याबाबत

**(१३) * ५७२९१ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.चेतन तुपे (हडपसर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.पी.एन.पाटील (सडोलीकर) (करवीर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश देण्याचे अमिष दाखवून विद्यार्थ्यांची आर्थिक फसवणूक होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय प्रवेशासाठी NEET परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांचा डेटा घेऊन त्यातील विद्यार्थी व पालकांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून महाविद्यालयाच्या बनावट लेटरहेडवर बनावट शिक्याचा वापर तसेच वैद्यकीय प्रवेशाची खोटी कागदपत्रे तयार करुन बनावट ई-मेल आयडी तयार करून विद्यार्थ्यांना पाठवले गेले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच,अलिबाग (जि.रायगड) येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय कार्यालयातून ऑल इंडिया कोटा अँड स्टेट कोटा सेलकडून नामनिर्देशित विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची प्रक्रिया पार पडत असून तेथील वैद्यकीय महाविद्यालयात एम.बी.बी.एस.साठी प्रवेश देण्याचे प्रलोभन दाखवून अनेक विद्यार्थ्यांकडून सुमारे ६० लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले असल्याने त्याप्रकरणी अलिबाग पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात येवून पुढील तपास स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेमार्फत करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच,मुंबई, नवी मुंबई, रायगड, भंडारा या भागातील विद्यार्थ्यांच्या पालकांकडूनही एम.बी.बी.एस.ला प्रवेश मिळवून देण्याचे अमिष दाखवून लाखो रुपयांची फसवणूक करणा-या पाच जणांच्या आंतरराज्य टोळीला नेरुळ (नवी मुंबई) पोलिसांनी दिनांक १८ जानेवारी,२०२३ रोजी वा त्यासुमारास अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

अलिबाग, जि.रायगड येथे माहे डिसेंबर २०२२ मध्ये व नवी मुंबई येथे जानेवारी, २०२३ मध्ये अशी बाब निदर्शनास आली आहे.

(३) सदर प्रकरणी अलिबाग पोलीस स्टेशन जि. रायगड येथे दि. २८.१२.२०२२ रोजी गु.र.न. ३६६/२०२२ भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ४६८, ४७०, ४७१, ३१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ३ आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

(४) व (५) सदर प्रकरणी नवी मुंबई पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रात नेरुळ पोलीस स्टेशन येथे दोन गुन्हे व वाशी पोलीस स्टेशन येथे एक गुन्हा दाखल आहे.

यापैकी नेरुळ पोलीस स्टेशन येथील गु.रं.न. १९/२०२३ मध्ये ५ आरोपींना अटक करण्यात आली आहे तर गु.रं. न. २६/२०२३ या दुस-या गुन्ह्यात एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. तसेच वाशी पोलीस स्टेशन येथील गु.रं. न. १३/२०२३ मधील आरोपींचा शोध सुरू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ठाणे, पालघर आणि रायगड या कोकण विभागात कुपोषणाचे वाढते प्रमाण रोखण्याबाबत करावयाच्या उपाययोजना

**(१४) * ५६५५४ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), ॲड.अशोक पवार (शिरुर),**

**श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय जगताप (पुरंदर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ठाणे, पालघर आणि रायगड या कोकण विभागात गेल्या आठ महिन्यात सुमारे ३२२६ बालके तीव्र कुपोषीत तर ३२,५३५ बालके मध्यम कुपोषीत असल्याची माहिती आरोग्य विभागाच्या अहवालानुसार निदर्शनास आली असून सदर भागात शासनातर्फे अनेक योजना राबविल्यानंतरही ८ महिन्यात केवळ ३४८ बालकांना तीव्र कुपोषणातून बाहेर काढण्यात यश आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हास्तरावरील अमृत आहार योजना, पूरक पोषण आहार या योजना अंतर्गत स्तनदा माता व गरोदर माता आणि बालकांनाही योग्य प्रमाणात पोषण आहार पुरविण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने प्रति बालक रुपये १२०० वरुन २५०० इतक्या अनुदान वाढीची तरतूद करुनही त्याची अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महिला आणि बालविकास विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग व आदिवासी विकास विभाग कुपोषण रोखण्यासाठी एकत्रित काम करत असतानाही या विभागांचा एकमेकांशी समन्वय नसल्याने कुपोषणाचे प्रमाण वाढतच आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कुपोषणाचे प्रमाण रोखण्यासाठी शासनाने नागरी बालविकास केंद्र सुरु करण्याचा निर्णय घेतला असल्याचे माहे डिसेंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे नाही.

माहे मे,२०२२ या महिन्याच्या मासिक प्रगती अहवालानुसार कुपोषण स्थिती खालील प्रमाणे आहे

| जिल्ह्यांचे नाव | एकूण वजन घेतलेली बालके | सर्वसाधारण श्रेणीमधील बालके | % | मध्यम कमी वजनाची बालके | % | तीव्र कमी वजनाची बालके | % |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ठाणे | २६७७९६ | २४११०८ | ९०.०३ | २३६६१ | ८.८३ | ३०२७ | १.१३ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| रायगड | १३२८२७ | १२८५०१ | ९६.७४ | ३६१६ | २.७२ | ७१० | ०.५३ |
| पालघर | १७७७८६ | १३६७९९ | ७६.९४ | ३४८७४ | १९.६१ | ६११३ | ३.४३ |
| एकूण | ५७८४०९ | ५०६४०८ | ८७.९ | ६२१५१ | १०.३९ | ९८५० | १.७ |

माहे डिसेंबर,२०२२ या महिन्याच्या मासिक प्रगती अहवालानुसार कुपोषण स्थिती खालील प्रमाणे आहे.

| **जिल्ह्यांचे नाव** | **एकूण वजन घेतलेली बालके** | **सर्वसाधारण श्रेणीमधील बालके** | **%** | **मध्यम कमी वजनाची बालके** | **%** | **तीव्र कमी वजनाची बालके** | **%** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ठाणे | २५८६१० | २३४९०६ | ९०.८३ | २११२१ | ८.१६ | २५८३ | ०.९ |
| रायगड | १२८४८१ | १२४९१८ | ९७.२२ | ३०३७ | २.३६ | ५२६ | ०.४ |
| पालघर | १६८६४७ | १३०३६४ | ७७.२९ | ३२७३१ | १९.४० | ५५५२ | ३.२ |
| एकूण | ५५५७३८ | ४९०१८८ | ८८.२ | ५६८८९ | १०.२३ | ८६६१ | १.५ |

वरील दोन्ही महिन्यांच्या पोषण स्थितीचा तुलनात्मक अभ्यास केला असता असे लक्षात येते की, मे, २०२२ महिन्यातील कुपोषणापेक्षा डिसेंबर,२०२२ चे कुपोषणाचे प्रमाण कमी झालेले आहे.

(२) हे खरे नाही.

माहे डिसेंबर,२०२२ च्या मासिक प्रगती अहवालानुसार पोषण आहार दिलेल्या लाभार्थ्यांची संख्या खालील प्रमाणे आहे.

| **अनु क्र.** | **लाभार्थी प्रकार** | **एकूण संख्या** |
|---|---|---|
| १ | ६ महिने ते ३ वर्ष | २९७४३८९ |
| २ | ३ वर्ष ते ६ वर्ष | २८२०४११ |
| ३ | गरोदर महिला व स्तनदा माता | ११५१५४१ |

अमृत आहार योजनेंतर्गत लाभ दिलेल्या लाभार्थ्यांची संख्या खालील प्रमाणे आहे.

| **अनु क्र.** | **लाभार्थी प्रकार** | **एकूण संख्या** |
|---|---|---|
| १ | गरोदर महिला व स्तनदा माता | ३३५९५९ |
| २ | ७ महिने ते ६ वर्ष | १६००६२९ |

(३) बाल संगोपन योजनेअंतर्गत प्रति लाभार्थी प्रति माह देय असलेले अनुदानामध्ये वाढ करुन रु. २५००/- एवढे अनुदान देण्यास शासन निर्णय दिनांक १७.०२.२०२३ अन्वये मान्यता देण्यात आलेली असून सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी दिनांक ०१.०४.२०२३ पासून करण्यात येणार आहे.

(४) हे खरे नाही.

महिला व बाल विकास विभाग, आदिवासी विकास विभाग आणि सार्वजनिक आरोग्य विभाग यांची गाभा समितीची एकत्रितरित्या बैठक होते. सदर बैठकीमध्ये कुपोषणाच्या समस्यांवर चर्चा होऊन योग्य ते निर्णय घेण्यात येतात.

(५) हे खरे नाही.

राज्यातील शहरी भागातील अति तीव्र कुपोषीत बालकांना सर्वसाधारण श्रेणीत आणणेसाठी नागरी बाल विकास केंद्र सुरु करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे. सद्यस्थितीत प्रायोगिक तत्वावर मुंबई उपनगर जिल्हयात चेंबूर, गोवंडी, मानखुर्द, ट्रॉम्बे, मुलूंड (पूर्व), शिवाजीनगर या प्रकल्पामंध्ये प्रायोगिक तत्वावर नागरी बाल विकास केंद्रे सुरु करण्यात आलेली आहेत.

(६) राज्यातील एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत-

१. एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत ६ महिने ३ वर्ष वयोगटातील बालकांना, गरोदर महिला, स्तनदा मातांना THR व ३ ते ६ वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार देण्यात येतो.

२. तसेच आदिवासी प्रकल्पामध्ये भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना सुरु आहे. सदर योजनेंतर्गत गरोदर महिला व स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार देण्यात येतो व ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवडयातून ४ दिवस अंडी व केळी देण्यात येते. या ४ दिवसांमध्ये शाकाहारी बालकांना प्रति दिन २ केळी व मांसाहारी बालकांसाठी १ अंडे देण्यात येते.

३. तसेच राज्यातील सॅम बालकांसाठी ग्राम बाल विकास केंद्र सुरु करण्यात आली आहेत. ग्राम बाल विकास केंद्रामध्ये तीन वेळचा अतिरिक्त आहार व आरोग्य खात्यामार्फत औषधोपचार करण्यात येतात.

४. राज्यात पोषण अभियान अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचा, किशोरवयीन मुली व महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध स्तरावरुन निरंतर शिक्षण वृध्दी दृष्टीकोन (ILA) समुदाय आधारित कार्यक्रम (CBE), रिअल टाईम मॉनिटरींग (ICT-RTM) व जन आंदोलन इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

-----------------

### राज्यातील जिल्हा परिषदांमध्ये भरती प्रक्रिया प्रलंबित असल्याबाबत

**(१५) * ५६५५२ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.संजय बनसोडे (उदगीर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी),**

**श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषदांमध्ये रिक्त असलेल्या पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला असून यांसदर्भात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने जिल्हापरिषदेच्या विविध १३५२१ पदांच्या भरतीसाठी राज्यभरातून १२७२३१९ उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज केले असून परीक्षा शुल्कापोटी रुपये २५ कोटी शासनाकडे जमा झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक वर्षापासून ही प्रक्रिया प्रलंबित असून दरम्यानच्या कालावधीत अनेक उमेदवारांची वयोमर्यादा देखील उलटून गेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील जिल्हा परिषदांच्या १३५०० पदांच्या भरतीचे वेळापत्रक दिनांक २६ ऑगस्ट, २०२२ रोजी जाहिर करुन ते दिनांक १९ सप्टेंबर,२०२२ रोजी रद्द देखील करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने अलिकडच्या काळात पोलीस भरती, अंगणवाडी सेविका भरती तसेच नगरपालिका, महानगरपालिका भरती जाहीर केलेली असतानाही जिल्हा परिषदांमधील रिक्त पदांची भरती प्रक्रिया प्रलंबित असल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जिल्हा परिषद भरती प्रक्रिया रखडल्याप्रकरणी दोषींवर कारवाई करुन भरती प्रकिया रखडल्यामुळे दरम्यानच्या काळात उमेदवारांची संपणारी वयोमर्यादा, बेकारीची वाढती संख्या लक्षात घेता सदरहू जिल्हा परिषद भरती प्रक्रिया तातडीने राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे आहे.

(५) हे खरे आहे.

(६) ग्रामविकास विभागाच्या अखत्यारीतील जिल्हा परिषदेंतर्गत गट-क मधील आरोग्य व इतर विभागातील संवर्गाच्या पदभरतीचा कालबद्ध कार्यक्रम विभागाच्या अनुक्रमे दि.२१ ऑक्टोबर, २०२२ व दि.१५ नोव्हेंबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आला होता.

तथापि, सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२१ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेल्या निर्देशानुसार परीक्षा टी.सी.एस./आय.बी.पी.एस. या कंपन्यांद्वारे ऑनलाइन पद्धतीने घ्यावयाच्या आहेत. त्यानुसार जि.प. स्तरावर आय.बी.पी.एस. या कंपनीसोबत सामंजस्य करार (MOU) अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे. तद्नंतर Application Portal विकसित करून लवकरच जिल्हा परिषद स्तरावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येणार आहे. तसेच दि.२१ ऑक्टोबर २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये माहे मार्च, २०१९ च्या जाहिरातीनुसार ज्या उमेदवारांनी यापूर्वी अर्ज केलेले/भरलेले आहेत, व सध्या वयाधिक्य झाले असल्याने ते परीक्षेस बसण्यास अपात्र

होऊ नये, याकरिता अशा उमेदवारांचे अर्ज स्वीकारून पुढील फक्त एका परीक्षेस बसण्याकरिता अशा उमेदवारांना वयोमर्यादेत सूट देण्यात आली आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भिवंडी (जि.ठाणे ) शहरातील इंदिरा गांधी स्मृती रुग्णालयामध्ये गर्भवती महिलेचा झालेला मृत्यू**

**(१६) * ५८८२५ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि.ठाणे ) शहरातील इंदिरा गांधी स्मृती रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आलेल्या नऊ महिन्याच्या गर्भवती महिला श्रीमती सविता दिनेश यादव यांचा रुग्णालयातील डॉक्टरांच्या व कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे दिनांक २० नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास,याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी यांनी मा.मुख्यमंत्री व मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना दिनांक २५ नोव्हेंबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत : (**१) प्राथमिक चौकशी अहवालावरुन दि. २०/११/२०२२ रोजी श्रीमती सविता दिनेश यादव यांचा मृत्यु झाला, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे यांच्या दि. ०२/१२/२०२२ च्या आदेशान्वये त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. चौकशी समितीने दि.२९/१२/२०२२ रोजी चौकशी अहवाल सादर केलेला आहे. सदरहू चौकशी अहवालाच्या अनुषंगाने दोषी असलेल्या २ वर्ष कालावधीकरीता नेमणूक असलेल्या दोन बंधपत्रीत वैद्यकीय अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई प्रस्तावित केली आहे. तसेच वैद्यकीय अधिक्षक यांचे रुग्णालय प्रशासनावर योग्य ते संनियंत्रण नसल्याने, सदर घटनेस त्यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तरतुदीनुसार शिस्तभंगविषयक कारवाई प्रस्तावित केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील शासकीय रुग्णालयांतील निवासी डॉक्टरांच्या निवासाची व्यवस्था करणेबाबत**

**(१७) * ५६७१२ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.रणधीर सावरकर**

**(अकोला पूर्व), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय यंत्रणेमार्फत जवळजवळ ७१०० वैद्यकीय प्रवेश होत असून गेल्या ६ वर्षांत वैद्यकीय शिक्षणातील पदव्युतरच्या (पोस्ट ग्रॅज्युएट) जवळजवळ १२०० जागा वाढविण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय पदव्युत्तर विद्यार्थ्यांची संख्या वाढूनही त्यांचेसाठी असलेल्या वसतिगृहांची संख्या मात्र गत अनेक वर्षापासून न वाढविल्यामुळे ५ ते ६ विद्यार्थ्यांना एकाच खोलीत राहण्याची वेळ विद्यार्थ्यांवर येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीत तब्बल १०००० खोल्यांची कमतरता असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात वैद्यकीय महाविद्यालयातील पदव्युतर जागांची संख्या वाढावी म्हणून सातत्याने प्रयत्न केले जातात, तसेच निवासी डॉक्टरांच्या विविध मागण्या शासनाने नुकत्याच मान्य केल्या परंतु त्यांच्यासाठी आवश्यक असणा-या सर्व पायाभुत सुविधा अद्यापही उपलब्ध नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार राज्यातील शासकीय रुग्णालयातील निवासी डॉक्टरांच्या निवासाची व्यवस्था करण्यासह सुसज्ज पायाभुत सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये मागील ०६ वर्षांमध्ये वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत जवळपास ७०० जागांची वाढ झालेली आहे.

(२) हे खरे नाही.

वाढीव जागांनुसार प्रवेशित झालेल्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या आवारातच निवासाची व्यवस्था संस्थास्तरावरुन उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(३) सद्यस्थितीत नवीन व वाढीव पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या जागांच्या संख्येमुळे नवीन वसतिगृह व अतिरिक्त खोल्यांची आवश्यकता भासणार आहे.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सरकारी रुग्णालयांत जेनेरिक औषधांचा पुरवठा होणार असल्याबाबत

**(१८) * ५६६२२ श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.चंद्रकांत**

**(भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांच्या परीसरामध्ये जेनेरिक औषधांची दुकाने उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिल्लीच्या नॅशनल फेडरेशन ऑफ फार्मर्स प्रोक्युरमेंट प्रोसेसिंस ॲन्ड रिटेलिंग को-ऑपरेटीव्ह ऑफ इंडिया (नॅकोफ) या कृषि क्षेत्रात काम करणा-या संस्थेला वैद्यकिय क्षेत्राचा कोणताही अनुभव नसतांना राज्यातील सर्व भागात तसेच सर्व महापालिका रुग्णालयाच्या आवारात "अमृत स्टोअर्स" उघडून त्या मार्फत जेनेरिक औषधांची दुकाने चालविण्याबरोबरच आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय शासनाने दिनांक २० जानेवारी,२०२३ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने स्पर्धात्मक निविदा मागविण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे** : (१) सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांच्या परीसरामध्ये जेनेरिक औषधांची दुकाने उभारण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला नाही. तथापि, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनूसार विभागाच्या अधिपत्याखालील १८ शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालयांमध्ये जेनेरीक औषधी केंद्रासाठी जागा देण्यात आली असल्याचे वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने कळविले आहे.

(२) नॅशनल फेडरेशन ऑफ फार्मर्स प्रोक्यूअरमेंट प्रोसेसिंग अँड रिटेलिंग को. ऑपरेटिव्ह ऑफ इंडिया (नॅकोफ इंडीया लिमी.) या केंद्र शासन अंगीकृत बहुराज्यीय संस्थेने प्रधानमंत्री जनऔषधी योजनेंतर्गत अनेक राज्यांमध्ये शासकीय रुग्णालयांत जनऔषधी केंद्र स्थापन केले आहेत. सद्य:स्थितीत भारत सरकारच्या अधिपत्याखालील १. डॉ.राममनोहर लोहिया, रुग्णालय, नवी दिल्ली २. सफदरगंज रुग्णालय आणि व्ही.एम.मेडीकल कॉलेज, नवी दिल्ली ३. लेडी हार्डिंग मेडिकल कॉलेज आणि श्रीमती एस.के.रुग्णालय, नवी दिल्ली या रुग्णालयांमध्ये प्रधानमंत्री जनऔषधी योजनेतंर्गत जनऔषधालयांची उभारणी केलेली आहे.

मा.मंत्री मंडळाच्या मान्यतेने नॅकोफ इंडीया लिमी.या संस्थेस नगरविकास विभाग, शासननिर्णय क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१३७/नवि-२०,दि.०२.०२.२०२३ मधील अटी व शर्तीच्या अधीन राज्यातील नागरी स्वराज्य संस्थाद्वारे चालविण्यात येणाऱ्या रुग्णालयांच्या परीसरात जेनेरीक औषधी दुकान सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

(३), (४) व (५)
प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भिवंडी शहरात कार्यरत असलेल्या बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत**

**(१९)** * **५६६७६ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी शहरात वैद्यकिय प्रमाणपत्र नसलेल्या बोगस डॉक्टरांची संख्या १०० पेक्षा जास्त असल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी भिवंडी महापालिकेचे वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या असून तीन बोगस डॉक्टरांना पोलिसांनी अटक केली असल्याचे देखील निदर्शनास आले आहे , हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा अप्रशिक्षित व बोगस डॉक्टरांमुळे नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन बोगस डॉक्टरांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) अशंत: खरे आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) संबंधित बोगस डॉक्टरांविरुध्द वैद्यकीय व्यवसाय अधिनियम, १९६१ मधील कलम ३३ व ३६ अंतर्गत व भारतीय दंड संहिता, १८६० मधील कलम ४२० अन्वये कारवाई करण्यात आली असून गुन्हे दाखल केले आहेत. याबाबत पोलीसांमार्फत तपास सुरु आहे. बोगस वैद्यकीय व्यावसायिक शोधून काढण्यासाठी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या दि. ०५.०९.१९९१ रोजीच्या शासननिर्णयान्वये जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय तसेच नगरपालिका व महानगरपालिका स्तरीय समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत. दि. ०७.०२.२००० च्या शासननिर्णयान्वये प्रत्येक जिल्ह्यात जिल्हादंडाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पुनर्विलोकन समित्या गठीत करण्यात आलेल्या आहेत. तसेच मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यांसाठी पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०५.१२.२००१ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे. या समित्यांना व पोलीसांना बोगस वैद्यकीय व्यावसायिकांवर कारवाई करण्याबाबत दि. ०७.०२.२००० व दि.१९.०८.२००० च्या परिपत्रकान्वये तसेच दि.१५.१२.२०२१ च्या शासनपत्रान्वये सुचना देण्यात आल्या आहेत. या समित्या त्यांच्या कार्यक्षेत्रातील बोगस वैद्यकीय व्यावसायिकांचा आढावा घेऊन त्यांच्याविरुद्ध संबंधित न्यायालयात खटले दाखल करण्याची रितसर कारवाई पोलिसांमार्फत करतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यात जलजीवन मिशन अंतर्गत सुरु असलेल्या विकास कामात अनियमितता झाल्याबाबत

**(२०) * ५७९६५ श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यात जलजीवन मिशन अंतर्गत सुरु असलेली अनेक कामे एकाच ठेकेदाराला दिली जात असल्याने तसेच ही कामे निकृष्ट दर्जाची करुन सदर कामात अनियमितता झाल्याचा आरोप जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी मा.पालकमंत्री, सोलापूर यांचेकडे केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासाठी चौकशी समिती नेमून कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग यांना सक्तीने रजेवर जाण्याचे आदेश मा.पालकमंत्री, सोलापूर यांनी दिले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी नेमलेल्या चौकशी समितीला पंधरा दिवसाच्या आत अहवाल सादर करण्याच्या सूचना देऊन तीन महिन्याचा कालावधी होऊनही अद्याप अहवाल शासनास प्राप्त झाला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी ठेकेदार व संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करणेबाबत तसेच कामांची दुरुस्ती करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) अशा स्वरूपाची बाब निदर्शनास आणली आहे, हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ सोलापूर यांचे अध्यक्षतेखाली नेमलेल्या चौकशी समितीने चौकशी करून अहवाल पुढील कार्यवाहीसाठी जिल्हाधिकारी, सोलापूर यांना सादर केलेला आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात वैद्यकीय शिक्षण पूर्ण करणा-या विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागात एक वर्ष सेवा बंधनकारक करणेबाबत

**(२१) * ६०५६८ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वैद्यकिय शिक्षण पूर्ण करणा-या विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागात एक वर्ष सेवा करणे बंधनकारक असून तसे न केल्यास त्याऐवजी दहा लाख रुपये दंड भरावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बरेच विद्यार्थी हा दंड भरुन ग्रामीण भागात सेवा देण्यास नकार देत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रामीण भागात डॉक्टरांची नितांत गरज असताना वैद्यकीय शिक्षण पूर्ण करणा-या डॉक्टरांना ग्रामीण भागात सेवा देणे बंधनकारक करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.
(२) नाही.
एम.बी.बी.एस. अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांना आरोग्य सेवा संचालनालयाकडून सामाजिक दायित्व सेवेकरिता प्रक्रिया राबविण्यात येते.

(३) शासन निर्णय दिनांक १३/०६/२०२२ नुसार सामाजिक दायित्व सेवा न करता दंडाच्या रक्कमेचा भरणा करून सदर सेवेतून सूट मिळण्याची तरतूद रद्द करण्यात आली असून शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून राज्यातील शासकीय/महानगरपालिका/खाजगी महाविद्यालयात एम.बी.बी.एस. अभ्यासक्रमास प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांना सामाजिक दायित्व सेवा करणे अनिवार्य करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंडेगाव (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथील गोंदे औद्योगिक वसाहतीतील जिंदाल पॉलीफिल्म प्रा.लि.कंपनीमध्ये झालेल्या बॉयलरच्या स्फोटाबाबत

**(२२) * ५६६८८ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय पोतनीस (कलिना), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंढेगाव (ता.इगतपुरी,जि.नाशिक) येथील गोंदे औद्योगिक वसाहतीमधील जिंदाल पॉलिफिल्म्स,प्रा.लि कंपनीत बॉयलरचा स्फोट होऊन लागलेल्या आगीत तीन कामगारांचा मृत्यू तसेच अन्य १७ जण गंभीररित्या जखमी झाल्याचे दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,घटनेच्या दिवशी कंपनीत १०० कामगार कार्यरत असून त्यापैकी केवळ १७ कामगारांशी संपर्क झाला व ८३ कामगार बेपत्ता असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,सदर दुर्घटनेच्या ठिकाणास मा.मुख्यमंत्री यांनी भेट देऊन पहाणी करुन त्याबाबतची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश देऊन मृतांच्या वारसांना पाच लाख रुपये आर्थिक मदत देण्याचे घोषित केले, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, सदर कंपनीस कामगार आयुक्तांच्या पथकाने दर महिन्याला भेट देऊन पहाणी करणे बंधनकारक असतांना कामगार आयुक्त पथकाने सदर कंपनीस केव्हा भेट दिली व त्यामध्ये काय आढळून आले,
(५) असल्यास,उक्त प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करुन मृत व जखमींना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) व (२) जेपीएफएल फिल्म्स प्रा.लि.मुंढेगाव, (ता.इगतपुरी,जि.नाशिक) पुर्वीचे नाव-जिंदाल पॉलीफिल्म्स प्रा.लि. या कारखान्यात दि.०१.०१.२०२३ रोजी कारखान्याच्या बॅच पॉली प्लांन्टच्या तळमजल्यावर गरम थर्मिक फ्ल्युइड ऑईलची गळती होऊन, तिथे जमा झालेल्या ऑईलच्या वाफेचा (Vapour Cloud) स्फोट झाला, व नंतर त्यामुळे आग लागली.त्यामुळे सदर कारखान्यातील दुर्घटना ही बॉयलरचा स्फोट होऊन घडलेली नाही.

सदर स्फोटाच्या व आगीच्या दुर्घटनेमध्ये ३ कामगारांचा मृत्यू (दोन महिला व एक पुरुष) व २२ कामगार जखमी झाले आहेत .घटनेच्या दिवशी कारखाना परिसरात ७७७ कामगार काम करीत होते.त्यापैकी उपरोक्त मृत्यू व जखमी झालेल्या कामगारांशिवाय कोणताही कामगार/व्यक्ती बेपत्ता नाही.

(३) होय हे खरे आहे.

(४) “इज ऑफ डुईंग बिझनेस” मध्ये केंद्रीय निरीक्षण प्रणालीद्वारे (Central Inspection System) निरीक्षण करण्याकरीता आस्थापनांची माहिती ऑनलाईन संगणकीय प्रणालीवर येते .सदर आस्थापनांचे निरीक्षण करून निरीक्षण शेरे प्रविष्ठ (अपलोड) केली जातात.

कामगार आयुक्त यांच्या क्षेत्रीय कार्यालयामार्फत सदर कंपनीस दि.१४.११.२०२१ रोजी भेट देण्यात आली असून,विविध कामगार कायद्यांतर्गत तपासणी करण्यात आली आहे .आढळून आलेल्या त्रुटींची पूर्तता न झाल्याने संबंधित आस्थापना व कंत्राटदारांविरूध्द मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,इगतपुरी जि.नाशिक यांचे न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत.

(५) सदर दुर्घटनेची सविस्तर चौकशी करण्यासाठी जिल्हाधिकारी,नाशिक यांनी अपर जिल्हाधिकारी, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय चौकशी समिती गठित केली होती .सदर समितीचा अहवाल जिल्हाधिकारी,नाशिक यांचेकडे सादर करण्यात आला असून,भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याकरीता शिफारशी सुचविण्यात आल्या आहेत.

तसेच सदर घटनेची औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून चौकशी करण्यात आली असून, चौकशीदरम्यान आढळून आलेल्या नियम भंगाबाबत कारखान्याच्या भोगवटादाराविरूध्द मा .मुख्य न्यायदंडाधिकारी, नाशिक यांचे न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे.

तसेच सदर कारखान्याचा भोगवटादार व व्यवस्थापकांविरूध्द पोलीसांमार्फत संबंधित पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुर्घटनेतील ३ मृत कामगारांपैकी एका कामगाराच्या वारसांस नुकसान भरपाई देण्यासाठी कारखाना व्यवस्थापनाने आयुक्त,नुकसान भरपाई, नाशिक यांचेकडे रू.१५,७४,४००/- इतकी रक्कम जमा केली असून, उर्वरीत दोन मृत कामगार हे राज्य कामगार विमा मंडळाचे सदस्य असल्याने, त्यांच्या वारसास नुकसान भरपाई देण्यासाठी सदर प्रकरण राज्य कामगार विमा मंडळ कार्यालयाकडे दाखल करण्यात आले आहे.

तसेच कारखाना व्यवस्थापनाने ३ मृत कामगारांच्या वारसास प्रत्येकी रू.६.०० लक्ष आणि २२ जखमी कामगारांना एकूण रू.९,४०,०००/- इतकी रक्कम सानुग्रह अनुदानापोटी दिली आहे .कारखाना व्यवस्थापनाने ३ मृत कामगारांच्या वारसास नोकरी देऊ केली असून, जखमी कामगारांच्या औषधोपचाराचा रू.२९,९२,१८४/- इतका खर्च व्यवस्थापनामार्फत करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ग्रामीण आरोग्य सेवेत दिल्या जाणाऱ्या सुविधा बाबत

**(२३) * ५९२९२ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण, उपजिल्हा रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र आदी ठिकाणी इंडियन पब्लिक हेल्थ स्टॅन्डर्सने (आयपीएचएस) ठरवून दिलेल्या सुविधाच्या मापदंडाकडे आरोग्य विभागाने दुर्लक्ष केल्याचे दिनांक २४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सात जिल्ह्यांतील ४२ टक्के आरोग्य संस्थांमध्ये परिपूर्ण आरोग्य सुविधा नसल्याची धक्कादायक बाब लेखापरिक्षणा दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुरेशा प्रमाणात निधी असूनही आरोग्य विभागात अनेक ठिकाणी मोठया प्रमाणात असुविधा आढळून येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत** : (१) हे अंशत खरे आहे.

महालेखापाल लेखा परिक्षा -१, मुंबई कार्यालयाने Performance Audit on "Public Health Infrastructure and management of Health Services in Maharashtra" या संदर्भातील लेखा परिक्षणाच्या प्रारूप अहवालामध्ये सदर मुद्दा उपस्थित केला आहे.

(२) हे खरे आहे.

महालेखापाल कार्यालयाच्या लेखा परिक्षण प्रारूप अहवालानुसार राज्यातील सात जिल्ह्यांचे अमरावती, औरंगाबाद, चंद्रपूर, जळगाव, कोल्हापूर, नांदेड व पुणे केलेल्या लेखापरिक्षणामध्ये ४२ टक्के आरोग्य संस्थानी IPHS मागदर्शक तत्वाचे अवलंब केले नसल्याचे नमूद केले आहे.

(३), (४) व (५) हे खरे नाही.

मंजूर कृती आराखडा २०२२-२०२३ अंतर्गत आयपीएचएस मानकाप्रमाणे अपग्रेडेशन करिता आयपीएचएस विभागास अनु .क्र .१७० रु .४५२०.०० लक्ष तर २०२३-२०२४ अंतर्गत रु .७७७०.०० लक्ष निधी मंजूर करण्यात आला आहे. सदर अपग्रेडेशन करण्याकरिता केंद्र शासनाने डिसेंबर-२०२२ मध्ये चेकलिस्ट पाठवली असून सदर चेकलिस्टच्या अनुषंगाने जिल्ह्याकडून माहिती मागवून आरोग्य संस्थांमध्ये देण्यात येणाऱ्या सेवांमधील उणीवांची नोंद करण्याची कार्यवाही सुरु आहे .संस्थांमधील सेवा, मनुष्यबळ, पायाभूत सुविधा, यंत्रसामुग्री व उपकरणे यांचे गॅप ॲनालिसिस आरोग्य संस्थामधील कमरता अहवाल मागविण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## विक्रोली (पश्चिम) (मुंबई) येथील सिध्दिविनायक सोसायटी या इमारतीची वाहनतळ लिफ्ट कोसळून झालेला अपघात

**(२४) * ५६५५६ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा. वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रोली (पश्चिम) (मुंबई) येथील सिध्दिविनायक सोसायटी या इमारतीची वाहनतळ लिफ्ट कोसळून झालेल्या अपघातात एका कामगाराचा मृत्यू झाल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले,हे खरे आहे काय ,
(२) असल्यास उक्त प्रकरणी विकासकाविरुध्द सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई करण्यात आली तसेच मृत कामगाराच्या परिवारास आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) होय, हे खरे आहे.
श्री.सिध्दीविनायक को. ऑप. सोसायटी, लोकमान्य नगर, विक्रोळी (प.), मुंबई या सोसायटीच्या इमारतीमध्ये टॉवर लिफ्ट पार्किंगचे काम चालू असताना पार्किंग लिफ्टचे लोखंडी पॅलेट अंगावर कोसळून दि.०४.०१.२०२३ रोजी शिवमकुमार जैस्वाल या कामगाराचा मृत्यू झाला.
(२) होय, हे खरे आहे.
(३) कामगार उप आयुक्त, मुंबई उपनगर (पूर्व) यांचे कार्यालयातील क्षेत्रिय अधिकारी यांनी साईटवर प्रत्यक्ष भेट देवून मुख्य विकासक व संबंधित कंत्राटदार आस्थापनेस इमारत व इतर बांधकाम कामगार (कामगारांचे नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६, किमान वेतन अधिनियम १९४८, वेतन प्रदान अधिनियम, १९३६ व कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम, १९७० या विविध कामगार कायद्यांतर्गत दिनांक १०.०१.२०२३ रोजी निरीक्षण शेरे पारीत केले आहेत.
तसेच मे.सौर जगत बिल्डर ॲण्ड डेव्हलपर्स (मुख्य विकासक) या आस्थापनेच्या बांधकाम साईट बांधकामाच्या दृष्टीने धोकादायक असल्याचे निदर्शनास आल्याने इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ मधील तरतुदींनुसार इमारतीच्या बांधकामास कामबंद/मनाई आदेश दिनांक १३.०१.२०२३ रोजी पारीत करण्यात आलेले आहेत.
मयत कामगाराच्या वारसदारांना अपघात नुकसान भरपाई देणेबाबत श्रमिक नुकसान भरपाई आयुक्त, मुंबई यांच्या कार्यालयास तसेच मुख्य विकासक व कंत्राटदार यांना कामगार उपायुक्त, मुंबई उपनगर (पू.) यांच्या कार्यालयाच्या दिनांक १६.०१.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
सदर अपघाताशी संबंधित विकासकांचे प्रोजेक्ट मॅनेजर आणि संबधित कंत्राटदार यांच्यावर भारतीय दंड संहिता १८६० अंतर्गत कलम ३०४-ए व ३४ अन्वये गु.र.क्र.(FIR) ०८/२०२३, दि. ०४.०१.२०२३ रोजी पार्कसाईट पोलिस ठाणे, विक्रोळी, मुंबई येथे गुन्हा दाखल केलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आरोग्य विभागात विविध संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२५) * ५७०८० श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा),**

**ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरोग्य विभागात विविध संवर्गातील जवळपास १७ हजार पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्याचा निर्णय शासनाने माहे ऑक्टोबर,२०२२ मध्ये वा दरम्यान घेतला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याअनुषंगाने घेण्यात आलेल्या परिक्षेत गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आल्यामुळे सदर परिक्षा रद्द करण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.

ग्रामविकास विभागाच्या अधिपत्याखालील आरोग्य सेवेशी निगडीत १० हजार पदे रिक्त आहेत. तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील जवळपास १३ हजार पदे रिक्त आहेत.

(२) व (३) दि.२१.१०.२०२१ व दि.३१.१०.२०२१ रोजी घेण्यात आलेली गट क व ड पदभरती परिक्षा प्रक्रिया पेपर फुटीमूळे दि.२९.६.२०२२ रोजी रद्द करण्यात आल्याने नव्याने पदभरती करण्याकरिता आयुक्तालयास कळविण्यात आले आहे.

(४) सदरची पदभरती पूर्व प्रक्रियेची कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे.

(५)प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेत मनोविकार या आजाराचा समावेश करण्याबाबत

**(२६) * ५६८२९ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेत ९०० पेक्षा जास्त आजारावर उपचार, प्रक्रिया व शत्रक्रियांचा समावेश असला तरी या योजनेंतर्गत मनोविकार आजारावर लाभ मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, मनोविकार रुग्णांनाही विम्याचा लाभ देण्यात यावा असे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश असतानाही बहुतांश खाजगी कंपन्यांकडून विम्याचा लाभ मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच ,काही विमा कंपन्यांकडून ग्रुप विम्याच्या आधारावर अगदीच मोजक्या प्रकरणांमध्ये काही अंशी विम्याचा लाभ मिळत असल्याचे निदर्शनास आले आहे , हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेत मनोविकार या आजाराचा समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या एकत्रित योजनेत मनोविकाराकरीता एकूण ५ उपचारांचा समावेश आहे.

(२) व (३)

रुग्णांना आरोग्य विमा आणि ग्रुप विमा जारी करणाऱ्या विमा कंपन्या ह्या IRDA (Insurance Regulatory And Development Authority) संस्थेच्या अखत्यारीत येतात. IRDA (Insurance Regulatory And Development Authority) ही संस्था केंद्र शासनाच्या अखत्यारीत येते.

(४) एकत्रित योजनेमध्ये मनोविकाराकरीता एकूण ५ उपचारांचा समावेश केलेला आहे. राज्यातील अंगीकृत शासकीय रुग्णालयांतून या उपचारांचा लाभ या योजनेंतर्गत दिला जातो. दिनांक २३ सप्टेंबर, २०१८ पासून आजपर्यंत एकूण २०९१ रुग्णांनी लाभ घेतलेला असून दाव्यांकरीता रु.१,०३,९९,९८७/- एवढी रक्कम विमा कंपनीद्वारे अंगीकृत रुग्णालयांना अदा केलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सावर्डे (ता.मोखाडा,जि.पालघर) या आदिवासी बहुल गावातील दोन कुपोषित बालकांचा योग्य उपचाराअभावी झालेला मृत्यू

**(२७) * ५६७८२ श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात सुमारे २५०० बालके कुपोषित असून सावर्डे (ता.मोखाडा,जि.पालघर) येथील दोन बालकांचा कुपोषणामुळे मृत्यू झाल्याचा प्रकार माहे जानेवारी २०२३ मध्ये वा त्यादरम्यान उघडकीस आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्र, खोडाळा व उपजिल्हा रुग्णालय, जव्हार येथे या बालकांवर व्यवस्थित उपचार करण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालघर जिल्ह्यात रुग्णालयाने नोंदविलेले बालकांचे वजन व अंगणवाडी सेविकांनी नोंदविलेले वजन यात तफावत आढळून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बालकांचे वजन मोजणारी यंत्रणा सदोष असल्यामुळे त्यासंदर्भात तातडीने उपाययोजना करण्याबाबत अध्यक्ष, जिल्हा परिषद,पालघर यांनी प्रशासनाला सूचना दिलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी सखोल चौकशी करुन कुपोषणाने होणारे मृत्यू रोखणे, वजन काट्यांतील दोष व तफावत दुर करणे तसेच संबंधित दोषींवर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत

आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) अंशत: खरे आहे.

पालघर जिल्ह्यात माहे डिसेंबर, २०२२ अखेर अति तीव्र कुपोषित (SAM) १४४ व मध्यम तीव्र कुपोषित (MAM) १८९५ बालके आहेत. पालघर जिल्ह्यात दिनांक ३१.१२.२०२२ रोजी एक बालमृत्यू झाला असून सदर बालमृत्यू Aspiration Pneumonia (LRTI) मुळे झाला आहे व दुसरा बालमृत्यू झालेल्या बालकाचा जन्म दिनांक ९.११.२०२२ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्रात झाला होता. मृत्यू पूर्वी २ दिवस आधी बालकाचे पोट फुगल्यामुळे सदर बालकाला प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले व उपचार करुन घरी नेण्यात आले होते. तद्नंतर दिनांक १२.०१.२०२३ रोजी बालकाचा मृत्यू राहत्या घरी झाला आहे व शवविच्छेदन न झाल्यामुळे मृत्यूचे कारण समजू शकले नाही.
(२) हे खरे नाही.

मोखाडा येथील बालकावर सुरुवातीला प्राथमिक आरोग्य केंद्रात व नंतर ग्रामीण रुग्णालय मोखाडा येथे आवश्यक ते उपचार करण्यात आलेले होते. तथापि, पुढील उपचारादरम्यान सदर बालकाचा उपजिल्हा रुग्णालय, जव्हार येथे दिनांक ३१.१२.२०२२ रोजी मृत्यू झालेला आहे.
(३) हे खरे नाही.
अंगणवाडी सेविकेने घेतलेले वजन ९.१०० कि.ग्रॅ. होते. तथापि, आजारादरम्यान सदर बालकाचे वजन कमी झाल्यामुळे रुग्णालयात केलेले वजन ७ कि.ग्रॅ. होते.
(४) हे खरे आहे.
(५) सदर बाबत चौकशी करण्यात आली असून सदरचे बालमृत्यू कुपोषणाने झालेले नसून, एका बालकाचा मृत्यू Aspiration Pneumonia (LRTI) मुळे झाला आहे व दुसरा बालमृत्यू झालेल्या बालकाचा जन्म दिनांक ९.११.२०२२ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्रात झाला होता व सदर बालकाला प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले व उपचार करुन घरी नेण्यात आले होते. तद्नंतर दिनांक १२.०१.२०२३ रोजी या बालकाचा मृत्यू राहत्या घरी झाला आहे व शवविच्छेदन न झाल्यामुळे मृत्यूचे कारण समजू शकले नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्हा परिषदेच्या बहुतांशी शाळा अत्यंत धोकादायक स्थितीत असल्यामुळे हजारो विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाल्याबाबत

**(२८) * ५६७५१ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हा परिषदेच्या ६५ हून अधिक शाळांमधील १०० हून अधिक वर्गखोल्या अत्यंत धोकादायक स्थितीत असून शिक्षण घेत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न उद्भवल्या प्रकरणी प्रहार जनशक्ती पक्षाच्या विरार येथील पदाधिकाऱ्याने मा. मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी पालघर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा पालघर यांना दिनांक ८ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदन सादर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धोकादायक व मोडकळीस आलेल्या शाळांचे प्रस्ताव अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे यांच्याकडे सादर केले आहे, हे ही, खरे आहे काय,
(३) असल्यास,उक्त प्रकरणी तात्काळ कारवाई करण्याचे आदेश उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) जिल्हा पालघर यांनी शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांना दिनांक ३० ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन** : (१) होय, हे अंशत :खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे अंशत :खरे आहे.
(४) व (५) प्रकरणावर नियमानुसार कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## राज्यात जल जीवन मिशन अंतर्गत अपूर्ण कामे कालबध्द पध्दतीने पूर्ण करणेबाबत

**(२९) * ५७९६७ श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.संजय जगताप (पुरंदर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जल जीवन मिशन अंतर्गत ३६००० योजनांचा समावेश असून त्यापैकी केवळ सव्वा दोन हजार योजना पूर्ण झाल्याने उर्वरित सर्व योजना अद्याप अपूर्ण असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने सदर योजनांची कामे कालबध्द पध्दतीने पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) जल जीवन मिशन अंतर्गत राज्यामध्ये जिल्हा परिषदेमार्फत ३५०५१ व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत ९२८ अशा एकुण ३५९७९ योजना राबविण्यात येत असून दि.२१.०२.२०२३ रोजीच्या स्थितीनुसार २५८४ योजनांची कामे पूर्ण झाली आहेत.
(२) जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत राज्यात रुपये ५२९६०.२६ कोटी खर्चाच्या ३५९७९ योजना करण्याचे प्रस्तावित आहे. मार्च,२०२४ पर्यंत राज्यातील सर्व योजनांची कामे पुर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

पाणी पुरवठा योजनांची कामे कालबध्दरित्या पुर्ण करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

१. पाणी पुरवठा योजनांची कामे पुर्ण करण्यासाठी अंदाजपत्रकीय किंमतीनुसार ८ महिने ते ३६ महिने पर्यंत कालावधी निश्चित करण्यात आला आहे.

२. पाणी पुरवठा योजनेचे सर्वेक्षण, प्रकल्प अहवाल तयार करणे, योजनेची संनियंत्रण करण्यासाठी प्रत्येक महसुली विभागनिहाय प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थांची निवड करण्यात आली आहे.
३. योजनेचा निविदा कालावधी कमी करण्यात आला आहे.
४. कंत्राटदारांची निवड करण्यासाठी कंत्राटदारांचे पॅनेल तयार करण्यात आले आहे.
५. क्षेत्रियस्तरावर तांत्रिक मान्यता, प्रशाकीय मान्यता तसेच निविदा स्वीकृतीचे अधिकाराचे प्रदान करण्यात आले आहेत.
६. जलसंपदा विभागाकडे पाणी आरक्षण करण्याची पूर्व अट शिथील करण्यात आली आहे.
७. जल जीवन मिशन अंतर्गत संबंधित अंमलबजावणी यंत्रणांमार्फत राबविण्यात येणा-या योजनांच्या कामाच्या प्रगतीचा नियमित आढावा विभागाच्यास्तरावरुन व्हि.सी.द्वारे घेण्यात येतो.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पांगरी (ता.बार्शी, जि.सोलापूर) येथील फटाक्याच्या कारखान्यात झालेल्या स्फोटाबाबत**

**(३०) * ५६६९३ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.अजित पवार (बारामती), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.चेतन तुपे (हडपसर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरोळे-पांगरी (ता.बार्शी, जि.सोलापूर) येथील फटाक्याच्या कारखान्याला आग लागून ३ महिलांचा मृत्यू व २० कामगार जखमी झाल्याचे दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू फटाका कारखाना बेकायदेशीररित्या सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कंपन्यांना कामगार आयुक्तांच्या पथकाने दर महिन्यास भेट देऊन पाहणी करणे बंधनकारक असतानाही त्याची अंमलबजावणी होत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने सदर दुर्घटनेस जबाबदार असणाऱ्या संबंधीतांवर कारवाई करण्यासह उक्त दुर्घटनेत मृत पावलेल्या कामगारांच्या नातेवाईकांना व जखमींना अर्थसहाय्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) इंडियन फायर वर्क्स,गट नं.४६९, पांगरी, ता.बार्शी जि.सोलापूर या फटाके निर्मिती करण्याऱ्या कारखान्यात दि.०१.०१.२०२३ रोजी लागलेल्या आगीमुळे स्फोट होऊन,तीन महिला कामगारांचा

घटनास्थळी मृत्यू झाला.

तसेच इतर दोन गंभीर जखमी झालेल्या महिला कामगारांचा वैद्यकीय उपचारादरम्यान मृत्यू झालेला आहे.तसेच एक महिला मजूर जखमी झालेली होती.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही,

"इज ऑफ डुईंग बिझनेस" मध्ये केंद्रीय निरीक्षण प्रणालीद्वारे (Central Inspection System) निरीक्षण करण्याकरीता आस्थापनांची माहिती ऑनलाईन संगणकीय प्रणालीवर येते. सदर आस्थापनांचे निरीक्षण करून निरीक्षण शेरे प्रविष्ठ (अपलोड) केली जातात.

(४) सदर दुर्घटनेची औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून चौकशी करण्यात आली आहे.

चौकशीदरम्यान दि.१.१.२०२३ रोजी कारखान्यात जेसीबी मशिनच्या सहाय्याने खड्डे तयार करण्याचे काम सुरू होते. यादरम्यान जेसीबी मशिनचे ब्लेड व दगड यामध्ये घर्षण झाल्यामुळे तेथे ठिणगी निर्माण झाली.ती ठिणगी जमिनीवर विखुरलेल्या अवस्थेत असणाऱ्या शोभेच्या फटाक्याच्या ज्वलनशील दारूवर पडली. त्यामुळे शोभेच्या दारूने पेट घेऊन, आग लागून स्फोट झाला असल्याचे आढळून आले आहे.

सदर कारखान्याच्या भोगवटादाराविरूध्द कारखाने अधिनियम,१९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ च्या नियम भंगाबाबत मा.न्यायदंडाधिकारी, सोलापूर यांचे न्यायालयात एकत्रित फौजदारी खटला दाखल करण्यात आला आहे.

तसेच पांगरी पोलिस ठाणे,ता.बार्शी जि.सोलापूर येथे भारतीय दंड संहिता, १८६० व भारतीय विस्फोटक अधिनियम, १८८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणातील आरोपींना परवाना प्राप्त जागेव्यतिरिक्त अन्य ठिकाणी विषयांकित व्यवसाय केल्याने त्यांचे नांवे असलेले अधिकृत परवाने रद्द करण्यात आले आहेत.

मृत कामगारांच्या वारसांना मा. मुख्यमंत्री सहायता निधीतून योग्य ती मदत मिळण्यासाठी जिल्हाधिकारी,सोलापूर यांचे कार्यालयाकडून प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

तसेच मृत कामगारांच्या वारसास नुकसान भरपाई देण्याबाबत आयुक्त, नुकसान भरपाई सोलापूर आणि कारखाना भोगवटादारास नुकसान भरपाई त्वरीत देण्याबाबत उप संचालक,औद्योगिक सुरक्षा व आरोग्य,सोलापूर यांनी दि. ३.१.२०२३ व दि.९.१.२०२३ रोजी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील वरळी येथील अविघ्न टॉवर मध्ये लिफ्ट कोसळून झालेल्या अपघाताबाबत

**(३१) * ५६८१७ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

((१) मुंबईतील वरळी येथील अविघ्न टॉवर या १५ मजली निर्माणाधीन इमारतीतील लिफ्ट कोसळून दिनांक ९ जानेवारी,२०२३ रोजी वा त्यासुमारास दोन कामगारांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार विकासकाविरुध्द कारवाई करुन मृत कामगारांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.सुरेश (भाऊ) खाडे** : (१) होय, हे खरे आहे.
(२) अविघ्न हाऊस, डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी नाका, मुंबई या इमारतीच्या काचा साफ करण्याचे काम करीत असताना दि.०९.०१.२०२३ रोजी दोन कामगारांचा १९ व्या मजल्यावरुन पडून अपघाती मृत्यू झाला.

मे.फेअरलीप प्रॉपर्टीज यांच्या मे.अविघ्न हाऊस, (मुख्य मालक) या आस्थापनेविरुद्ध कामगार उप आयुक्त, मुंबई शहर कार्यालयामार्फत इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ अंतर्गत दि. १३.०१.२०२३ रोजी निरीक्षण शेरे पारीत केले आहेत.

मे.अविघ्न हाऊस या आस्थापनेचे बांधकाम साईट सुरक्षिततेच्या दृष्टीने धोकादायक असल्याचे निदर्शनास आल्याने इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ मधील तरतूदीनुसार दि.२०.०१.२०२३ रोजी कामबंद आदेश बजावण्यात आले आहेत.

तसेच इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ आणि कंत्राटी कामगार (नियमन व निर्मूलन) अधिनियम, १९७० अंतर्गत विकासक आणि कंत्राटदार यांच्यावर खटले दाखल करण्याची कार्यवाही कामगार उपआयुक्त, मुंबई शहर यांच्या कार्यालयामार्फत चालू आहे.

कंत्राटदारामार्फत मयत कामगार नूर आलम व जमिल रहमत अली यांचे वारसदारास अनुक्रमे रक्कम रु. २,२०,०००/- व रु.१,५०,०००/- इतकी प्राथमिक मदत देण्यात आली आहे.

नुकसान भरपाई अधिनियम, १९२३ अंतर्गत श्रमिक नुकसान भरपाई आयुक्त तथा कामगार न्यायालय, मुंबई यांना मृत कामगारांच्या वारसास भरपाई मिळवून देण्याकरिता दि.२०.०१.२०२३ रोजीच्या पत्राने कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.